RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ९, अंक २१] सोमवार, जून १९, २०२३/ज्येष्ठ २९, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ३०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.—** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. | **पृष्ठे** १—३ |

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जून २०२३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. III OF 2023.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

**सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१९६६ चा महा. ३७. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३० ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (१) च्या परंतुकातील खंड (दोन) मधील, " महानगरपालिकांच्या बाबतीत " या मजकुराऐवजी, " महानगरपालिकेच्या किंवा, यथास्थिति, नियोजन प्राधिकरणाच्या बाबतीत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६६ चा महा. ३७.

## निवेदन

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) या अन्वये स्थापन केलेल्या प्रदेशांमधील जमिनींचा विकास व वापर करण्याचे नियोजन करण्यासाठी हा अधिनियम अधिनियमित केला आहे. नगर नियोजनाच्या योजना योग्य रीतीने केल्या आहेत आणि त्यांची अंमलबजावणी परिणामकारकरित्या करण्यात येत आहे याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने विकास योजनेचा उद्देश घोषित करण्यासाठी, ती तयार करण्यासाठी, सादर करण्यासाठी व तिला मंजुरी देण्यासाठी अनुपालन करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाच्या प्रकरण तीनमध्ये तरतूद केली आहे.

२. उक्त अधिनियमामध्ये सर्व नियोजन प्रक्रियेसाठी एका कालबद्ध कार्यक्रमाची तरतूद केली आहे आणि जर, नियोजन प्राधिकरण, विनिर्दिष्ट कालावधीत नियोजन करण्यात निष्फळ ठरले तर, नियोजनाची संपूर्ण प्रक्रिया, व्यपगत होते.

३. उक्त अधिनियमाच्या कलम ३० मध्ये अशी तरतूद आहे की, प्रत्येक नियोजन प्राधिकरण, विकास योजना तयार केल्यासंबंधी कलम २६ अन्वये शासकीय **राजपत्रामध्ये** नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत विकास योजनेचा मसुदा मंजुरीसाठी राज्य शासनास सादर करील. उक्त कलम ३० च्या परंतुकामध्ये अशी तरतूद आहे की, असा कालावधी, एक कोटी किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेच्या बाबतीत, एकूण चोवीस महिन्यांपर्यंत आणि दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेच्या बाबतीत, एकूण बारा महिन्यांपर्यंत वाढविता येईल.

४. असे निदर्शनास आले आहे की, दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या नियोजन प्राधिकरणांना, उक्त कलम ३० च्या पोट-कलम (१) च्या परंतुकाच्या खंड (तीन) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, सहा महिन्यांच्या वाढीव कालावधीत विकास योजनेचा मसुदा मंजुरीकरिता राज्य शासनाकडे सादर करणे अडचणीचे ठरत आहे आणि अशी शक्यता आहे की, प्रकरण तीन अन्वये विकास योजनेचा मसुदा तयार करण्याची व मंजूर करण्याची प्रक्रिया अल्प कालावधीमुळे व्यपगत होऊ शकते आणि अंतिमतः, यामुळे अशा नियोजन प्राधिकरणांच्या अधिकार क्षेत्रातील क्षेत्रांच्या विकास प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो.

म्हणून, उक्त अधिनियमाच्या प्रकरण तीन अन्वये वेळेत प्रक्रिया पूर्ण करता यावी म्हणून, नियोजन प्राधिकरणाने राज्य शासनाकडे विकास योजनेचा मसुदा सादर करण्याचा कालावधी, दहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक परंतु, एक कोटीपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या महानगरपालिकेस लागू असल्याप्रमाणे, सहा महिन्यांवरून एकूण बारा महिन्यांपर्यंत वाढविणे आवश्यक आहे. म्हणून, राज्य शासनास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ३० मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते.

५. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **रमेश बैस,**
दिनांक १७ जून २०२३. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**असीम कुमार गुप्ता,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.